जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१९/०९/२०२४
## दि.१८/०९/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे १८३/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम.१०९,३५१(२)३५२,११८(१) |
| **फिर्यादी** | एक महिला वय २९ वर्षे रा.कसबा पेठ पुणे |
| **आरोपीत** | अमित आनंदराज पिल्ले वय ३३ वर्ष रा.कसबा पेठ पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०९/२०२४ रोजी रात्रौ २१/०० वा.चे सुमारास फिर्यादी यांचे रहाते घरासमोर,कसबा पेठ पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पती व भाऊ हे वर नमुद केले ता.वेळी घरी दारू पित बसले असताना त्या दोघामध्ये कोणत्यातरी कारणावरून बाचाबाची व शिवीगाळ सुरू झाली असता फिर्यादी यांचे पतीने रागाचे भरात रहाते घरातील किचन मधील भाजी कापण्याचा चाकुने भावास मारणेसाठी जात असतांना फिर्यादी यांनी पतीस अडवण्याचा प्रयत्न केला असता फिर्यादी यांचे उजवे हातास लागुन जखम झाली तसेच जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने भावाच्या पोटात दोन ते तीन वेळा भोकसुन गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला . |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी.डुकरे मो.नं.८५५४९१८०२५ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरुड पो स्टे २७५/२०२४,भारतीय न्याय संहिता कलम ३३१(४),३०५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ८३ वर्षे रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १७/०९/२०२४ रोजी रात्रौ १९/०० वा. ते दिनांक १८/०९/२०२४ रोजी सकाळी ०८/४५ वा.फ्लॅट नं.१७,सौदामणी कौ.हौ.सोसायटी,उजवी भुसारी कॉलनी,कोथरुड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे लोखंडी सेफ्टी दरवाजाचा कोंयडा तोडुन आत प्रवेश करुन लाकडी कपाडातील लॉकर तोडुन कपाटातील रोख ३०,०००/- रुपये व सोन्याचे दागिने असा एकुण ०४,५०,०००/- रु किंमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.मोहन चव्हाण मो.नं.९०११११३५९७ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३६१/२०२४, भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १०९ |
| **फिर्यादी** | एक इसम वय २३ वर्षे, रा.गुलटेकडी,पुणे |
| **आरोपीत** | अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०९/२०२४ रोजी रात्रौ २२/३० वा.चे सुमारास गोखले हॉस्पीटल समोर,भारत पेट्रोल पंपाजवळ,टिळक रोड,स्वारगेट पुणे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचे मित्र वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी आले असता सदर ठिकाणी खुप मोठया प्रमाणात गणेश मिरवणुक पाहणेकरीता गर्दी झाली होती. सदर गर्दीमध्ये फिर्यादी व त्यांचे मित्र एकत्र मिळुन डान्स करीत असताना तेथील एका अनोळखी इसमा बरोबर फिर्यादी यांचा मित्र याची धक्का-बुक्की झाल्याने ते एकमेकांबरोबर भांडु लागले त्यावेळी सदर इसमाने कुणाल यास ढकलुन देवुन गर्दीमधुन बाजुला नेवुन त्यास मारहाण करु लागल्याने फिर्यादी त्यांचे भांडण सोडवण्यास जात असताना सदर अनोळखी इसमाने भांडणाचा राग मनात धरुन मित्रास जिवे ठार मारण्याचे उद्देशाने त्याचे पोटावर चाकु सारख्या धारदार शस्त्राने भोकसुन गंभीर जखमी केले आहे |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.सुभाष राठोड,मो.नं.९८२३६१४२५० |

**४**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५२१/२०२४,भारतीय न्याय संहीता कलम १०६,२८१ सह मोटार वाहन कायदा कलम १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | नाथसिंह युवराज चव्हाण,वय २४ वर्षे, रा.शिवणे,पुणे |
| **आरोपीत** | भगवान पांडुरंग क्षीरसागर,वय ४८ वर्षे,रा.माळेवाडी,ता.वाळवा,जि.सांगली (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १८/०९/२०२४ रोजी सायंकाळी १८/४५ वा.चे सुमारास वडगाव ब्रिजचे सुरूवातीस,सातारा-मुंबई जाणारे हायवे मुख्य रस्त्याचे डावे बाजुक डील लेनवर,वडगाव,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील टॅंकर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार फिर्यादी यांचे वडील नामे युवराज शंकरराव चव्हाण,वय ६५ वर्षे,रा.फ्लॅट नं.५०२,ढेणे हाईटस, देशमुखनगर, शिवणे,पुणे हे चालवत असलेल्या ज्युपीटर गाडीस पाठीमागुन धडक देवुन गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.उप.निरी.८७८८८३१६३० |

**५**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १५४/२०२४, भारतीय न्याय संहीता कलम १०९,३(५) व महाराष्ट्र पोलीस अधिनीयम कलम ३७(१)(३) सह १३५ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ६० वर्षे,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपीत** | १)अभिजीत सुरेश उभे,वय २५ वर्षे,रा.अमरज्योत मित्र मंडळा जवळ,केळेवाडी,कोथरुड,पुणे.<br>२)नेताजी सुभाष धुमाळ,वय २५ रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०९/२०२४ रोजी २३/३० वा.चे दरम्यान एस.एन.डी.टी.बसस्टॉप जवळ,मेट्रो स्टेशन पुलाखाली,एरंडवणा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे मुलाचा चार महीन्यापुर्वी यातील नमुद इसम याचे चुलत भावाचे पत्नीच्या मोबाईल फोनवर चुकुन मिस कॉल गेला असता त्या कारणावरुन नमुद इसम व फिर्यादी यांचे मुला मध्ये वाद व मारहाण झाली होती.सदर भांडणाचा व चुलत भावाच्या पत्नीस कॉल केला याचा राग मनात ठेवुन यातील नमुद इसमांनी वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा मुलगा हा गणेश विसर्जन मिरवणुक पाहात उभा असताना त्यास तु माझ्याकडे रागाने का पाहतोस असे बोलुन जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने लोखंडी रॉडने डोक्यावर,पाठीवर, उजव्या खांद्यावर मारुन गंभीर जखमी करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.गोरक्ष घोडके,मो.नं.७५८८१ ७००८० |

**६**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे ३०२/२०२४, भारतीय न्याय संहीता कलम १०९(१) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ६८ वर्षे,रा.हिंगणे,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०९/२०२४ रोजी दुपारी १५/३० वा.चे सुमारास मी ५८६ आंबिल ओढा येथील एस.आर.ए.स्कीमचे साईट ऑफिसवर सिंहगड रोड पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी असताना यातील नमुद इसम हा त्या ठिकाणी येवुन फिर्यादी यांना तुम्ही चालु असलेल्या बांधकाम साईटवर स्थानिक लोकांना काम का देत नाही असे म्हणाला त्यावर त्यास आमचे साहेबांना विचारुन घे असे फिर्यादी म्हणाले होते,त्यानंतर फिर्यादी हे सायं.१६/०० वा.चे सुमारास बांधकामाचे साईटवर पाहणी करण्यासाठी सहकारी यांचे सोबत गेले असता यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचे पाठीमागुन |

| | |
|---|---|
| | येवुन फिर्यादी यांचे सोबत असणाऱ्या सहकाऱ्यांना खाली जाण्यास सांगुन त्याने फिर्यादीस हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व नंतर तेथेच पडलेल्या अॅल्युमिनीयमच्या पट्टीने डावे डोळ्याचे वरील बाजुस नाकावर डाव्या हातावर व उजव्या खांद्यावर जोरात मारुन जखमी केले, व त्याचे जवळील चाकुने जीवे मारण्याचे उद्देशाने गळ्यावर डावे बाजुस वार करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.तृप्ती पाटील/माळी.मो.नं.९०२८७८४३४३ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ७५१/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४७ वर्षे, रा.बालेवाडी,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०५/२०२४ ते दि.१३/०६/२०२४ रोजीचे दरम्यान राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना शेअर ट्रेडिंग मार्फत नफा मिळवून देतो असे सांगुन त्यांचा विश्वास संपादन करून जास्तीचा नफा मिळवून देण्याचे बहाण्याने फिर्यादी यांची २२,५४,४१०/- रूपये ची अर्थिक फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) श्री.नांद्रे मो.नं.९८८१६७०६५९ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ८९३/२०२४, भा.न्या.संहिता कलम ३१९(२),३१८(४),३१६(५),६१(२) सह माहीती तंत्रज्ञान अधिनयम कलम ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ४६ वर्षे, रा.वाघोली पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०६/०४/२०२४ ते दि. ०४/०६/२०२४ रोजी पर्यंत ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील मोबाईल धारक यानी शेअर मार्केटमध्ये गुतवणुक करण्याच्या माध्यमातुन थोडीशी रक्कम देवुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून त्यांनी दिलेल्या वेगवेगळ्या बँक खात्यावर एकुण ४९,३६,९१३/-रूपये ट्रान्सफर करण्यास संगीतले व त्याबदल्यात कोणताही परतावा व मुळ रक्कम परत न करता फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी.श्री.रेजितवाड मो.नं.९९२३८१९५३५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**